# जाहिर प्रकटन

पुणे महानगरपालिकेचे परिपत्रक सन १९८६ अन्वये महानगरपालिकेच्या वसाहतीतील सदनिका कर्मचा-यांना उपलब्ध करून देण्यासाठी अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत. तथापि विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता अनेक कर्मचा-यांनी महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडे अर्ज करून सदनिकेची मागणी केली आहे. या अर्जदार कर्मचा-यांना क्रमाक्रमाने सदनिका उपलब्ध करून देण्यासाठी प्रतिक्षा यादी तयार करण्याचे मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी आदेशित केले असून त्याअन्वयेचे पत्र क्र. अतिमआ(ज) /१०१, दि. १३/०५/२०१० चे प्राप्त झाले आहेत.

खालील नमुद केलेल्या नवीन अटी/शर्तींसह पुर्वीच्या अटी/शर्तींचा समावेश करून अद्ययावत धोरणनिश्चितीची कार्यवाही विभागाकडून सुरू आहे. ती लवकरच प्रसिध्द करण्यात येईल. मा.आयुक्त साहेब यांच्या आदेशानुसार खालीलप्रमाणे अर्जदारांची प्रारूप यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. या यादीवर अनुक्रमांकाबाबत किंवा अन्य हरकत असल्यास सदरची हरकत पुराव्यासह चाळ विभागाकडे दि. ३१/१०/२०१० अखेर सादर करावी. या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

**नवीन- अतिरिक्त अटी/शर्ती**

१). मनपा वसाहतीतील सदनिका यापुढे रेंट फ्री(आर.एफ.क्यु.) या तत्वावर वाटप केल्या जातील.

२). मान्य वारसदारांच्या नावे सदनिका हस्तांतरण (वर्गीकरण) करतानाही त्या रेंट फ्री (आर.एफ.क्यु.) या तत्वावर राहतील.

३). नवीन वाटप, सदनिका वर्गीकरण, सदनिका बदल(ट्रान्सफर) इत्यादी केल्यास सब रजिस्टारकडून दस्त नोंदणी(ॲग्रीमेंट) करणे जरूरीचे आहे.

४). मनपा वसाहतीतील सदनिका वाटप झाल्यानंतर सदर सेवकाने ताबा घेतल्याच्या दिनांकापासून २ महिन्याच्या आत सदनिकेचा वापर राहण्यासाठी सुरू करणे आवश्यक आहे. ताबा घेतल्याच्या दिनांकापासून २ महिन्यानंतरही जे अधिकारी/ सेवक अशा सदनिकेंचा वापर करणार नाहीत. अशा अधिकारी/सेवक यांच्याकडून सदरच्या खोल्या त्वरीत ताब्यात घेण्यात येऊन त्या गरजू कर्मचा-यांना अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज.) यांच्या मान्यतेने वाटप करण्यात येतील.

५). सदनिका प्रतिक्षा यादीवरील सेवक मयत अथवा सेवानिवृत्त झाल्यास त्याच्या पात्र वारसांनी धोरणानुसार नवीन अर्ज व संबंधित कागदपत्रे सादर करून त्यांना प्रतिक्षा यादीवरील नवीन/चालू नंबर दिला जाईल. (जुन्या यादी अनुक्रमांकाचा लाभ मिळणार नाही.)

६). या यादीच्या प्रसिध्दीनंतर अंतिम यादी प्रसिध्द होईपर्यंत नव्याने आलेले अर्ज विचारात न घेता दप्तरी दाखल केले जातील.

७). सदर यादी प्रारूप असून यादी निकषाप्रमाणे तपासण्यात आली नसून यादी निश्चितीनंतर क्रमवारीत बदल होऊ शकेल. त्याचप्रमाणे काही अर्जदारांचे अर्ज अपात्र ठरू शकतात. त्यामुळे केवळ यादीत नाव आहे म्हणजे सदनिकेसाठी हक्क प्राप्त झाला असे समजले जाणार नाही.

८). सदनिका वाटपाचे धोरण अंतिम झाल्यानंतर विहीत नमुन्यातील अर्ज भरणे व इतर कागदपत्रांची पुर्तता मुदतीत पुर्ण करण्याची संबंधीत सेवकाची व्यक्तीगत जबाबदारी राहील.

९). अतिम यादीत नाव समाविष्ट झाले तरी उपलब्धतेनुसारच सदनिका वितरित केल्या जाणार असल्यामुळे केवळ अंतिम यादीत नाव आहे म्हणून सदनिकेसाठी हक्क प्राप्त होणार नाही.

**उपआयुक्त(गवनि)**
पुणे महानगरपालिका

**उपआयुक्त (गवनि) कार्यालय**
पुणे महानगरपालिका
जावक क्र. उआ(गवनि)/
दिनांक – /९/२०१०

**मा. सांख्यिकी प्रमुख**
पुणे महानगरपालिका

यांजकडेस..

**विषय – पुणे मनपा वेबसाईटवर माहिती उपलब्ध करून देणेबाबत.**
**संदर्भ –** मा. महापालिका आयुक्त यांचे आदेश.

पुणे महानगरपालिकेच्या वसाहतीतील सदनिका भाडेत्तवावर/लायसेन्सी पध्दतीने मिळणेसाठी मनपातील विविध सवर्गातील सेवकांनी विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता चाळ विभागाकडे अर्ज केले आहेत. अशा सेवकांची श्रेणी (हुद्दा) नुसार वर्गवारी करून आमच्याकडील आवक क्रमांकाप्रमाणे प्रारूप प्रतिक्षा यादी तयार केली आहे ती सोबत जोडली आहे.

संदर्भांकित आदेशानुसार सदर यादी पुणे मनपा वेबसाईटवर माहितीसाठी प्रसिध्द करणे आवश्यक असल्याने व त्याअनुषंगाने प्रचलित अटी/शर्ती बरोबर काही नवीन अटी/शर्ती लागू करणे. त्याबाबत काही हरकती येऊन त्यात सुधारणा होणे अपेक्षित आहे. त्यासाठी जाहिर प्रकटन देत आहोत.

तरी आदेश पुर्ततेसाठी विनाविलंब प्रारूप सदनिका प्रतिक्षा यादी, जाहिर प्रकटन पुणे मनपा वेबसाईटवर प्रसिध्द करून तसा अहवाल आमच्या कार्यालयाकडे कळवावा.

कळावे.

**उपआयुक्त (गवनि)**
पुणे महानगरपालिका

**सोबत** – १) प्रतिक्षा यादी ( पान नं. १ ते ३६)
२) जाहिर प्रकटन